नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ६९ | Issue - 69 | वार शनिवार दि. २६ जुलै २०२५ | Blow- Saturday Date 26 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारताची हवाई ताकद दुपटीने वाढली

## २००० कोटींचा करार; संरक्षण मंत्रालयाकडून महत्त्वाची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय लष्करासाठी हवाई संरक्षण फायर कंट्रोल रडार खरेदी करण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने शुक्रवारी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडबरोबर (बीईएल) दोन हजार कोटी रुपयांचा करार केला. माऱ्यावर नियंत्रण ठेवणारी (फायर कंट्रोल) ही रडार लढाऊ विमाने, हल्ला करणारी हेलिकॉप्टर आणि शत्रूचे ड्रोन यांसह हवाई मार्गाने येणाऱ्या सर्व प्रकारच्या धोक्यांचा माग काढू शकतात.

'भारतीय-स्वदेशी बनावटीच्या उत्पादनांची श्रेणी' या अंतर्गत या दोन हजार कोटी रुपयांच्या खरेदीची अंमलबजावणी केली जाईल. या रडारमध्ये किमान ७० टक्के स्वदेशी सामग्री आहे. हे फायर कंट्रोल रडार लढाऊ विमाने, हल्ला करणारी हेलिकॉप्टर आणि शत्रूचे ड्रोन यांसह सर्व प्रकारच्या हवाई धोक्यांचा माग काढण्यास सक्षम असतील,' असे संरक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले. 'लष्कराच्या हवाई संरक्षण तुकड्यांच्या आधुनिकीकरणात ही रडार महत्त्वपूर्ण टप्पा ठरतील. यामुळे भारतीय सैन्याची कामकाज सज्जता वृद्धिंगत होईल,' असे मंत्रालयाने निवेदनात म्हटले.



संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) ड्रोनद्वारे मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वीरीत्या पार पाडली. 'डीआरडीओने यूएव्ही लाँच्ड प्रीसिजन गाइडेड मिसाइल (यूएलपीजीएम)-व्हीश् या क्षेपणास्त्राची आंध्र प्रदेशातील कुर्नुल येथील नॅशनल ओपन एरिया रेंज येथून यशस्वी चाचणी केली. त्यामुळे देशाच्या संरक्षण क्षमतेला बळ मिळाले आहे,' असे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'यूएलपीजीएम-व्ही३' सांगितले. ही डीआरडीओच्या ही आहे. 'यूएलपीजीएम-व्हीर'ची अद्ययावत आवृत्ती उच्च-स्पष्टतेच्या ड्युअल-चॅनेल सीकरने सुसज्ज असलेले हे क्षेपणास्त्र विविध प्रकारच्या लक्ष्यांवर मारा करू शकते; तसेच ते सपाटीच्या प्रदेशातून आणि उंचीवरील भागातूनही डागता येऊ शकते.

तीन वर्षांत तिप्पट उपग्रह : नारायणन

भारताला पुढील तीन वर्षांत अवकाशातील उपग्रहांची संख्या तिप्पट करावी लागेल. सन २०४० पर्यंत अवकाश तंत्रज्ञान आणि त्यासाठीच्या पायाभूत सुविधा क्षेत्रात भारत प्रगत देशांशी स्पर्धा करील, असा विश्वास इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी शुक्रवारी व्यक्त केला. जी. पी. बिर्ला स्मृती व्याखानमालेत 'भारतीय अवकाश कार्यक्रम : कामगिरी, आव्हाने आणि भविष्यातील दृष्टिकोन' या विषयावर बोलताना व्ही. नारायणन यांनी भारताच्या अवकाश कार्यक्रमाचा आढावा घेऊन पुढील उपक्रमांबाबत भाष्य केले. 'यंदा इस्रोने १२ मोहिमांचे नियोजन केले आहे. येत्या ३० जुलै रोजी 'जीएसएलव्ही एफ १६'द्वारे 'निसार'च्या प्रक्षेपण करण्यात येणार आहे. सध्या देशाचे ५५ उपग्रह जनतेची सेवा करीत आहेत. पुढील तीन वर्षांत भारतीय उपग्रहांची ही संख्या सुमारे तिप्पट होईल. उपग्रहांची मागणी मोठी असून, ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने भारताचे प्रयत्न सुरू आहेत,' असे नारायणन यांनी सांगितले.

# कोकाटेंना डच्चू, धनंजय मुंडेंना पुन्हा मंत्रिपद मिळणार? अजितदादाचं मोठं वक्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे: माजी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या काळात झालेल्या खरेदीत गैरव्यवहार झाला नसल्याचे चौकशीत आढळले आहे. त्यात मुंडे यांना क्लीन चिट देण्यात आली आहे. आणखी एका प्रकरणाची चौकशी सुरू असून, त्यात ते दोषी न आढळल्यास मुंडे यांना पुन्हा संधी देऊ,' असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंडे यांच्या पुनर्वसनाचे संकेत दिले.

कृषी खात्यातील कथित गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे मुंडे यांना मंत्रिपद गमवावे लागले. नुकतीच न्यायालयाने मुंडे यांना क्लीन चिट दिल्याचे समोर आले आहे. त्या पार्श्वभूमीवर, मुंडे यांचे मंत्रिमंडळात पुनर्वसन करणार का, या प्रश्नाला उत्तर देताना, 'मुंडे यांच्या संदर्भातील दुसऱ्या प्रकरणाच्या चौकशीतही ते दोषमुक्त ठरल्यास त्यांना पुन्हा संधी देऊ,' असे अजित पवार म्हणाले.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे विधिमंडळात रमी खेळत असल्याची चित्रफित जाहीर झाल्याने त्यांच्यावर मंत्रिपद गमावण्याची टांगती तलवार आहे. त्यांचा राजीनामा घेणार का, या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, 'सध्या मुख्यमंत्री दिल्लीत एका बैठकीला गेले आहेत. माझी आणि त्यांची सोमवारी भेट होईल. त्यानंतर मंगळवारी मी कोकाटे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेईन. मंत्रिमंडळात कोणाला ठेवायचे, कोणाला नाही हा मुख्यमंत्र्यांचा अधिकार आहे.' कोणत्या मंत्र्यांना पद गमवावे लागणार आहे, असे विचारता, 'मला माहिती नाही', असे सांगून त्यांनी अधिक बोलणे टाळले. धनंजय मुंडे यांच्या कृषी खात्यातील घोटाळ्याबाबत आरोप करण्यात आले. त्यामुळे मुंडे यांना मंत्रिपद गमवावे लागले. त्यासंदर्भात नुकतीच न्यायालयाने मुंडे यांना क्लीन चिट दिल्याचे समोर आले आहे. त्या पार्श्वभमीवर, मुंडे यांचे पुन्हा मंत्रिमंडळात पुनर्वसन करणार का, असा प्रश्न अजित पवार यांना विचारण्यात आला. त्यावर, 'धनंजय मुंडे यांच्यावर कृषी विभागाबाबत जे आरोप करण्यात आले होते. त्यात न्यायालयाने क्लीन चिट दिली आहे. मात्र, त्यांच्याबाबत माध्यमांमधून प्रसिद्धी देण्यात आल्याने त्यांची बदनामी झाली. कुटुंबीयांना मनःस्ताप झाला. ते आता भरून निघू शकत नाही. मुंडे यांच्या संदर्भात एका प्रकरणाची न्यायालयीन चौकशी सुरू आहे.

# राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता या बाबी महत्त्वाच्या असल्याने राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करून शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य द्यावे, अशा सूचना शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिल्या.

**शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेच्या अनुषंगाने राज्यातील शाळा इमारत सुरक्षितेसाठी राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी तातडीने बैठक घेतली. मंत्रालयात झालेल्या या बैठकीस प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव समीर सावंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, समग्रचे प्रकल्प संचालक संजय यादव, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि राज्यातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व शिक्षणाधिकारी सहभागी झाले होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिक क्षेत्रातील शाळा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिटही करावे. याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करावा. जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या शाळा इमारतींची तपासणी करून त्यांची बांधकामे नव्याने करण्यासाठी सर्व्हे करून सर्व समावेशक आराखडा तयार करावा. तसेच धोकादायक शाळा इमरतींच्या बांधकामासाठी प्राधान्यक्रम ठरवून जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही राज्यमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले.

# मंत्रालयात आता ऑफलाइन प्रवेश बंद; डिजिप्रवेश १ ऑगस्टपासून अनिवार्य

मुंबई : राज्य सरकारकडून मंत्रालयात प्रवेशासाठी जुन्या पद्धतीने दिला जाणारा ऑफलाइन प्रवेश यापुढे बंद करण्यात येणार आहे. येत्या एक ऑगस्टपासून मंत्रालयातील प्रवेशासाठी डिजिप्रवेश ही ऑनलाइन प्रक्रिया अनिवार्य केली जाणार आहे. या संदर्भातील सूचना मंत्रालयातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आली असून, त्याशिवाय सर्व मंत्री कार्यालयांतही याबाबतची सूचना देण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी शुक्रवारी दिली.

राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी मंत्रालयातील प्रवेशासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'फेस रेकग्नायझेशन' प्रणालीला सुरुवात केली होती. या प्रणालीची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर मंत्रालयात यापुढे अभ्यागतांना प्रवेशासाठी नवी प्रणाली सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. त्यानुसार आता मंत्रालयातील प्रवेशासाठी डिजिप्रवेश ही नवी ऑनलाइन प्रक्रिया या वर्षाच्या सुरुवातीपासून लागू करण्यात आली आहे. आता डिजिप्रवेश ऑनलाइन प्रणालीच्या माध्यमातूनच अभ्यंगताना प्रवेश दिला जाणार आहे. जुनी पद्धत पूर्णपणे मोडित काढण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. ही प्रक्रिया एक ऑगस्टपासून सक्तीची केली जाणार आहे.

# उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी आयोगाची तयारी सुरू; निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताच्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीच्या आवश्यक प्रक्रियेसाठी भारत निवडणूक आयोगाने नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. संविधानातील अनुच्छेद ३२४ नुसार, उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचे आयोजन करणे ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. या निवडणुकीसाठी राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक अधिनियम, १९५२ आणि त्याखालील नियम, १९७४ लागू होतात.

या अधिनियमाच्या कलम ३ नुसार, निवडणूक आयोग केंद्र सरकारच्या सल्ल्यानुसार निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करतो, ज्यांचे कार्यालय नवी दिल्ली येथे असते. याशिवाय, एक किंवा अधिक सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारीही नियुक्त केले जाऊ शकतात. परंपरेनुसार, लोकसभा किंवा राज्यसभा सचिवालयाचे महासचिव हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आलटून पालटून नियुक्त केले जातात. मागील उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी लोकसभा सचिवालयाचे महासचिव निवडणूक निर्णय अधिकारी होते.

त्याअनुषंगाने, आगामी उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी राज्यसभा सचिवालयाचे महासचिव यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती कायदा व न्याय मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार आणि राज्यसभेचे उपसभापती यांची संमती घेऊन करण्यात आली आहे. याशिवाय, श्रीमती गरिमा जैन, संयुक्त सचिव (राज्यसभा सचिवालय) आणि श्री विजय कुमार, संचालक (राज्यसभा सचिवालय) यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत राजपत्र अधिसूचना स्वतंत्रपणे प्रकाशित करण्यात येणार आहे, असे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**अमित शाह, राजनाथसिंह, जे. पी. नड्डा, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान, नीती आयोगात भेट**

**गावांना सिमेंट रस्त्यांनी जोडणार, सांडपाणी प्रक्रिया, बांबू क्लस्टर, अनेक प्रकल्पांना गती**

# राज्यातील विकास प्रकल्पांसाठी मुख्यमंत्र्यांच्या दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील विविध विकास प्रकल्पांच्या पाठपुराव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेले दोन दिवस दिल्लीत अनेक नेत्यांच्या भेटी घेतल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथसिंह, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर तसेच नीती आयोगाशी या बैठका झाल्या.

**अमित शाह आणि राजनाथसिंह यांची सदिच्छा भेट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची संसद भवनात सदिच्छा भेट घेतली. महाराष्ट्राशी संबंधित विविध प्रकल्पांवर तसेच विषयांवर त्यांनी चर्चा केली. सुमारे २५ मिनिटे ही बैठक चालली. मुख्यमंत्र्यांनी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचीही सदिच्छा भेट घेतली आणि विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा केली. केंद्रीय गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर आणि हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांचीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत सदिच्छा भेट घेतली.

**निर्मला सीतारामन यांची भेट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली आणि त्यात जागतिक वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी केंद्रीय आर्थिक व्यवहार मंत्रालयाकडून परवानगी देण्याची मागणी केली. महाराष्ट्राने आपली अर्थव्यवस्था सर्व निकषांवर उत्तम राखल्याबद्दल निर्मला सीतारामन यांनी यावेळी प्रशंसा केली. या प्रकल्पांमध्ये १००० लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रिट रस्त्यांनी जोडण्यासाठीचा प्रकल्प आहे. यासाठी आशियाई डेव्हलपमेंट बँकेकडून १ अब्ज डॉलर्स (सुमारे ८६५१ कोटी रुपये) इतके आर्थिक सहाय्य मागण्यात आले आहे. दुसरा प्रकल्प महाराष्ट्रातील समुद्रकिनार्याची पातळी वाढत असल्याने त्याचे नैसर्गिक उपायांनी निराकरण करणे हा आहे. यासाठी ५०० मिलियन डॉलर्स (सुमारे ४३२६ कोटी रुपये) इतकी मदत मागण्यात आली आहे. तिसरा प्रकल्प महापालिका शहरांमधून सांडपाण्यावर प्रक्रिया करुन उद्योगांसाठी पुनर्वापर हा आहे. यासाठी ५०० मिलियन डॉलर्सचे (सुमारे ४३२६ कोटी रुपये) अर्थसहाय्य मागण्यात आले आहे. उर्वरित दोन प्रकल्पांसाठी जागतिक बँकेकडून मदत मागण्यात आली आहे. या तिन्ही प्रकल्पांसाठी वित्तमंत्रालयाने मंजुरी द्यावी, यासाठीचे निर्देश निर्मला सीतारामन यांनी या बैठकीत दिले. या बैठकीला वित्त विभाग सचिव अनुराधा ठाकूर, मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी आणि मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे उपस्थित होत्या.





**विदर्भात खताचा प्रकल्प, जे. पी. नड्डा यांच्याशी भेट**

केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांच्या भेटीत विदर्भात एक खतांचा मोठा प्रकल्प उभारण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली. नागपूर जिल्ह्यात गेल, फर्टिलायझर विभाग आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त उपक्रमातून हा १२.७ लाख टनाचा प्रकल्प असणार आहे. सुमारे १०,००० कोटींचा हा प्रकल्प असणार आहे. या प्रकल्पासाठी सबसिडी देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

यासंदर्भातील मंत्रिमंडळ प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना जे. पी. नड्डा यांनी दिल्या. फर्टिलायझर विभागाचे सचिव रजतकुमार मिश्रा यावेळी उपस्थित होते.

**१४,००० कि.मी.चे ग्रामीण रस्ते, शिवराजसिंह यांच्याशी भेट**

महाराष्ट्रात १४,००० कि.मी. चे रस्ते तयार करण्यासाठीचा एक प्रस्ताव महाराष्ट्राने केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाकडे दिला आहे. हा एकूण प्रस्ताव २.६ बिलियन डॉलर्सचा (सुमारे २२,४९० कोटी रुपये) असून, यातच एडीबीचे सहाय्य घेण्यात येणार आहे. २५ वर्ष मेंटेनन्स फ्री या तत्त्वावर हे रस्ते उभारण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांसाठी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरेल, यातून त्यांना चांगली कनेक्टिव्हीटी मिळेल, असे शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले. या प्रकल्पाला मदत करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. महाराष्ट्रात प्रधानमंत्री आवास योजनेत सर्वेक्षणाचे काम अतिशय गतीने केल्याबद्दल शिवराजसिंह चौहान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्रात देशात सर्वाधिक ३० लाख घरे केंद्र सरकारने मंजूर केली आहेत, हे याठिकाणी उल्लेखनीय.

**नीती आयोगाची बैठक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीआर सुब्रमण्यम आणि सदस्य राजीव गौबा यांची भेट घेतली. एफआरबीएम मर्यादा २५ टक्के असताना महाराष्ट्राने १८ टक्के इतकी ती राखल्याबद्दल नीती आयोगाने प्रशंसा केली. एनसीडी (नॉन कम्युनिकेबल डिसिज) स्क्रिनींगसाठी आर्टिफिशियल इंटिलिजन्सचा वापर, बांबू आधारित क्लस्टर (हे दोन्ही प्रकल्प प्रत्येकी ५०० मिलियन अमेरिकन डॉलर्सचे), मराठवाडा वॉटर ग्रीड आणि दमणगंगा-गोदावरी नदीजोड प्रकल्पासह अन्य जलसंधारण प्रकल्प (सुमारे १ अब्ज अमेरिकन डॉलर्स) तसेच महाराष्ट्रातील आयटीआयला खासगी उद्योगांशी जोडून कौशल्य प्रशिक्षणाचा कार्यक्रम इत्यादी प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा झाली आणि त्याचे सादरीकरण झाले. या प्रकल्पांच्या परवानग्यांना गती देण्यात येईल, असे आश्वासन निती आयोगाने दिले.

## संपादकीय....

### नियमाची अंमलबजावणी

राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी मंत्रालयातील प्रवेशासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी 'फेस रेकग्नायझेशन' प्रणालीला सुरुवात केली होती. या प्रणालीची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर मंत्रालयात यापुढे अभ्यागतांना प्रवेशासाठी नवी प्रणाली सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. त्यानुसार आता मंत्रालयातील प्रवेशासाठी डिजिप्रवेश ही नवी ऑनलाइन प्रक्रिया या वर्षाच्या सुरुवातीपासून लागू करण्यात आली आहे. आता डिजिप्रवेश ऑनलाइन प्रणालीच्या माध्यमातूनच अभ्यंगताना प्रवेश दिला जाणार आहे. जुनी पद्धत पूर्णपणे मोडित काढण्यात येणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. ही प्रक्रिया एक ऑगस्टपासून सक्तीची केली जाणार आहे. राज्य सरकारकडून मंत्रालयात प्रवेशासाठी जुन्या पद्धतीने दिला जाणारा ऑफलाइन प्रवेश यापुढे बंद करण्यात येणार आहे. येत्या एक ऑगस्टपासून मंत्रालयातील प्रवेशासाठी डिजिप्रवेश ही ऑनलाइन प्रक्रिया अनिवार्य केली जाणार आहे. या संदर्भातील सूचना मंत्रालयातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आली असून, त्याशिवाय सर्व मंत्री कार्यालयांतही याबाबतची सूचना देण्यात आल्या आहेत. डिजिप्रवेश ही एक आधार क्रमांकांसोबत संलग्न केलेली ऑनलाइन प्रणाली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून मंत्रालयात ज्या विभागात भेट द्यायची आहे किंवा ज्या अधिकाऱ्यांच्या भेटण्याकरिता जायचे आहे, त्याबाबतची सर्व माहिती या प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याशिवाय ही ऑनलाइन प्रक्रिया राबविताना अभ्यागतांची चेहरा पडताळणीही पूर्ण केली जाणार आहे. या प्रणालीच्या माध्यमातून १० सेकंदांत चेहरा पडताळणी पूर्ण केली जाणार आहे. त्याशिवाय क्यू आर कोडही उपलब्ध करून दिला जाणार आहे. या प्रणालीमुळे अभ्यागतांना भेटीसाठी लागणारा वेळही वाचणार आहे.

# पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटना इंटक च्या वतीने मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या समवेत झालेल्या कामगार संघटनेच्या बैठकीमध्ये सर्व मागण्या मान्य

**ैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे उपमुख्य अधिकारी यांच्यासमवेत बैठक आयोजित केली होती. यावेळी कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव आधापुरे, जनरल सेक्रेटरी अँड सुनील वाळुंजकर, नानासाह वाघमारे, उपाध्यक्ष संतोष सर्व गोड, दिनेश साठे जयंत पवार ,सतीश सोळंके, इत्यादी पदाधिकारी समवेत झालेल्या बैठकीत खालील मागण्या मान्य करण्यात आल्या.

यामध्ये प्रामुख्याने पंढरपूर नगरपरिषदेकडे सन २०२३ पासून ५६ सफाई कामगार व लिपिक शिपाई कर्मचारी सेवानिवृत्त झाले होते व यांना अपदनाची रक्कम रक्कम रुपये दोन कोटी ४२ लाख व रजा वेतनाची रक्कम एक कोटी सत्तर लाख देण्यात आलेली नव्हती. अनेक कर्मचारी सेवानिवृत्त होऊन सुद्धा पैसे मिळाले नसल्याने अतिशय आर्थिक अडचणी सापडले असल्याने ही बाब मुख्याधिकारी यांच्या निदर्शनास आल्यानंतर मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सकारात्मक भूमिका घेत अपचनाची रक्कम रुपये दोन कोटी ४२ लाख येत्या दोन ते तीन दिवसात देण्याची मान्य केलेले व उर्वरित रक्कम रजा देण्याची रक्कम लवकरच देण्यात येईल अशी आश्वासन दिले आहे. इतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या शिक्षणाप्रमाणे लिपिक व इतर बांधकाम या भागांमध्ये काम देण्याचे आश्वासन दिले. सफाई कर्मचारी लिपिक सेंटर इन्स्पेक्टर मग ग्रॅज्युएट उच्च शिक्षण घेतले आहे अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या शिक्षणानुसार लिखित बांधकाम विभाग अतिक्रमण विभाग कर विभाग यामध्ये कामे देण्याचे निर्णय घेण्यात आलेला आहे. अशा कर्मचाऱ्यांनी काम करायचा आहे त्यांनी मुख्याधिकारी व कामगार संघटना अध्यक्ष व जनरल सेक्टर यांच्याकडे त्यांची शैक्षणिक अहर्ता काम पाहून त्यांना निश्चित काम धीरे जे आश्वासन मुख्याधिकारी यांनी दिली आहे.




तसे गेल्या अनेक वर्षापासून नगरपालिका पतसंस्था नंबर एक यांची ६० ते ७० लाख रक्कम नगर परिषदेने दिलेली नव्हती त्यामुळे कर्मचारी पतसंस्था आर्थिक अडचणीत आली होती. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांनी आपली रक्कम मध्यवर्ती बँकेमध्ये ठेवली होती ठेवी ठेवले आहेत त्यांनाही रक्कम देण्याची अडचण आली होती तेही कर्मचारी आता सेवा नोंदविणारे त्यांनाही रक्कम देण्याचे ही निर्णय घेण्यात आला आहे. महबूब शेख हे २०१७ मध्ये माहित झाले होते. त्या कर्मचाऱ्यापर्यंत कोणतीही रक्कम मिळालेली नाही. त्यावर ही चर्चा होऊन सदर रक्कम देण्यात येईल असेही निर्णय घेण्यात आला. शिपाई लिपिक यांना १२ व २४ वर्षांचा तसेच१०/१०/३० आधारित प्रगती योजना लागू नये दृष्टीने लवकरच कारवाई करण्यात येईल असेही आश्वासन दिले. तसेच पर्वत उन्नती देण्यात येणार असे असाही प्रस्ताव जिल्हाधिकारी पाठवण्यात येईल असेही आश्वासन दिले.

सफाई कर्मचारीचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी वर्षातून दोन वेळा आरोग्य शिबिर घेण्यात येईल. जिल्हाधिकारी कुंभार आशीर्वाद यांच्याशी कर्मचाऱ्यांची चर्चा झाली होती. ज्या कामगारांची वस्ती आहे त्या ठिकाणी लेबरी व जिम ही करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला होता. त्याची करिवरी लवकरात लवकर देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले. कर्मचाऱ्यांची आरोग्य विभाग काढण्यात येणार असून नगरपरिषेकडून यादी ५०% रक्कम नगरपरिषद व ५० टक्के रक्कम कर्मचाऱ्याकडून पाच लाखापर्यंत कोणताही आधार झाला तर त्याची खर्च संबंधित विवाह कंपनी त्या दृष्टीने कर्मचाऱ्यांचा विमा उतरण्यात येणार आहे. मलेरिया येथे अनेक वर्षापासून रिक्त पदे कथडी पद्धतीने काम करत आहेत या कर्मचारी रिक्त पदावर सामावून घेण्यात येण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. सदर पदाची भरती करून त्यांना कामात समाविष्ट करावे असेही आश्वासन देण्यात आले. वेळोवेळी संघटनेची बैठक घेऊन मागण्या मार्गे लावण्याचे आश्वासन मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी दिले आहे.

होळी कामावर इंटेक्स संघटनेचे जनरल सेक्रेटरी अँड सुनील वाळुजकर यांनी आषाढी यात्रे कालाव मध्ये अतिशय उत्कृष्ट काम केल्याबद्दल कर्मचाऱ्यांच्या मागण्याला मान्यता देऊन ते काम प्रगतीपथावर नेण्याचे आश्वासन दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला व आभारही मान्यता आली. कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव आधापुरे. जनरल सेक्रेटरी अँड सुनील वाळूजकर, नानासाहेब वाघमारे जयंत पवार , नागनाथ तोडकर, धनाजी वाघमारे ,संतोष सोळंके, संतोष सर्व गोड, दत्तात्रय चंदनशिवे, संभाजी देवकर, संजय माने, पराग डोंगरे संदेश कांबळे राणी गायकवाड सचिन इंगळे वैभव दंदाडे गिरीश माने सुरेश पवार लक्ष्मण हुंडेकरी इत्यादी उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १५० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचा मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून विकसित महाराष्ट्र, ई-गव्हर्नन्स विषयक सुधारणा आणि सेवा विषयक प्रशासकीय सुधारणा या १५० दिवसाच्या कृती कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असलेली विविध कामे, उपक्रमांचा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज आढावा घेतला.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सचिव संजय दशपुते यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले, राज्यातील विकासकामांचा वेग वाढविण्यासाठी १५० दिवसांच्या कार्यक्रम अत्यंत



महत्त्वाचा असून या कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित कालमर्यादेत काम करून विकास कामाबरोबरच प्रशासकीय कामातही विभागाचे वेगळेपण सिद्ध करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १५० दिवसाच्या कार्यक्रमाचा सविस्तर आढावा घेऊन मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले, विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत करून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक कामे विहित कालावधीत पूर्ण करावीत. यामध्ये सेवा प्रवेश नियम, आकृतीबंध,अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती, सेवाज्येष्ठता आणि पदोन्नतीची प्रक्रिया यावर वेगाने काम करावे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून काम करणे गरजेचे आहे. यासाठी व्हिजन डॉक्युमेंटचा मसुदा मुदतीत पूर्ण करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रालय परिसरात बांधण्यात येणाऱ्या नवीन इमारत बांधकाम प्रकल्पांचा आढावा एका बैठकीत घेतला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सचिव संजय दशपुते आणि विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्रालय नवीन इमारतीचे बांधकाम कालमर्यादेत करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधितांना यावेळी दिल्या.

### राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे आवाहन

# विमा संस्थांनी जनजागृती, विश्वासार्ह सेवांवर भर द्यावा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विमा हा केवळ आर्थिक उत्पादन नसून तो सामाजिक सुरक्षा, जोखीम व्यवस्थापन आणि आर्थिक स्थैर्य यासाठी अत्यावश्यक साधन आहे. भारतीय विमा ब्रोकर संघटनेसारख्या संस्थांनी नागरिकांना केवळ विमा पॉलिसीची विक्री न करता जनजागृती, सुलभ माहिती आणि विश्वासार्ह सेवा देण्यावर भर द्यावा, असे आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

**आयबीएआयच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्थापना दिन कार्यक्रम**

कफ परेड येथे भारतीय विमा ब्रोकर संघटनेच्या (आयबीएआय) रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्थापना दिन कार्यक्रमात राज्यपाल श्री. राधाकृष्णन बोलत होते. भारतीय विमा ब्रोकर संघटनेचे अध्यक्ष नरेंद्रकुमार भरिंदवाल, राज्यपालांचे उपसचिव एस. रामामूर्ती, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणचे सदस्य सत्यजित त्रिपाठी, विमा समितीच्या सदस्या श्रीमती टी.एल. अलामेलू, आयबीएआयचे उपाध्यक्ष मोहन एस, सचिव निर्मल बजाज आदींसह शासकीय व नियामक संस्थांचे वरिष्ठ अधिकारी, विमा व वित्तीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले की, ही संस्था रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने हा आनंदाचा क्षण आहे. विमा दलाल (ब्रोकर) हे विमाधारक व विमा कंपनी यांच्यातील दुवा आहेत. ते ग्राहक केंद्रित आणि उपयोगी उपाय सूचवितात. भारत देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, त्यामध्ये कॉर्पोरेट विमा सेवांचे महत्व अधोरेखित होते. ते सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राच्या विमा उद्योगातील विस्ताराशीही संबंधित आहेत. हे सर्व राष्ट्रीय प्राधान्याचे विषय असून सुरक्षिततेची व्याप्ती आणि परस्पर सहकार्य विमा क्षेत्रातही महत्वाचे आहे. भारत क्षमतेचा विकास, ज्ञानाचे वाटप, आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार यामध्ये सक्रियपणे सहभागी होत आहे. विम्याचे भविष्य डेटा उपक्रमांमध्ये, ग्राहकांच्या सूचीबद्धतेमध्ये असल्याने आयबीएआयने यामध्येही सहभागी होवून भविष्यातील अर्थव्यवस्थेचे प्रेरणास्थान बनावे,असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

विद्यापीठ स्तरावर विमा प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी पुढाकार

युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. राज्यातील विद्यापीठात आयबीएआयसोबत संयुक्तपणे विमा शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्याचा मानस राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला. यावेळी आयबीएआयच्या २५ वर्षांतील स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन, लोगोचे अनावरण झाले. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणचे सदस्य सत्यजित त्रिपाठी, विमा समितीच्या सदस्या श्रीमती टी. एल. अलामेलू यांनीही विचार व्यक्त केले. अध्यक्ष श्री. भरिंदवाल यांनी प्रास्ताविक केले तर आभार निर्मल बजाज यांनी मानले.

# रामनगर सज्जनगड सोसायटी येथील नाल्यालगत बांधण्यात आलेल्या भिंतीच्या बांधकामात भ्रष्टाचार आशिर्वाद कोणाचा?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : जिल्हा वार्षिक योजना(सर्वसाधारण)अंतर्गत अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामध्ये नाल्यालगत वसलेल्या झोपडपट्टी वासियांच्या संरक्षणार्थ नाल्याच्या ठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम अंतर्गत १६९ घाटकोपर(पश्चिम) विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १२३ मधील रामनगर- ब सज्जनगड सोसायटी येथील नाल्यालगत बांधण्यात आलेल्या संरक्षण भिंतीच्या बांधकामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे.यामध्ये कंत्राटदाराला खुश करण्यासाठी जास्त रक्कमेचे टेंडर काढण्यात आले होते.आणि त्यामधील निम्म्याहून कमी रक्कम खर्च करून हे काम करण्यात आले असल्याचे सामाजिक कार्यकर्ते यांचे म्हणणे आहे. त्यामुळे या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध होत आहे.यासाठी याला आशिर्वाद नक्की कोणाचा आहे ? याची चौकशी होणे गरजेचे आहे.तसेच मनपा एन विभागाचे प्रभाग क्रमांक १२३(देखभाल)चे जबाबदार अधिकारी यांची भूमिका देखील याठिकाणी संशयास्पद असून या सर्व प्रकरणाची आणि या कामाची सखोल



चौकशी करण्यासाठी स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला असून त्यांनी महापालिका एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल केली असून मनपा एन विभागाचे(देखभाल) प्रभाग क्रमांक १२३चे संबंधित अधिकारी आणि सदर कामाच्या कंत्राटदारावर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

# मागास भागातील समुदायाचे कल्याण आणि समृद्धी साधण्यास प्राधान्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुख्यमंत्री यांच्या पुढाकाराने एटापल्ली तालुक्यात बाएफ संस्थेमार्फत कार्यान्वित प्रकल्पामुळे रोजगार संधीत वाढ, समुदाय कल्याण पूरक उपक्रमात स्थानिकांचा सक्रिय सहभाग

मुंबई : राज्य शासनाच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यात कॉर्पोरेट फाउंडेशनच्या आर्थिक मदतीने बाएफ (इखऋ) द्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या माध्यमातून या परिसरातील स्थानिक रोजगार संधी विस्तारण्यास पूरक वातावरण निर्माण होत आहे. याद्वारे येथील नागरिकांचे जीवनमान उंचावून समुदायाचे कल्याण आणि समृद्धी साधणे ही उद्दिष्टे साध्य होत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला कृतीशील प्रतिसाद देत कॉर्पोरेट फाउंडेशनच्या सहकार्याने बाएफ संस्थेमार्फत गडचिरोली जिल्ह्यात विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यात स्थानिक नागरिकांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मागास असलेल्या एटापल्ली या आकांक्षित तालुक्यात समन्वित उपजिविका विकास कार्यक्रम एटापल्ली तालुक्यातील २० गावात राबविण्यात येत आहे. याची प्रायोजक संस्था डइख फाउंडेशन आहे. १ एप्रिल २०२५ पासून पुढील ३ वर्षेपर्यंत हा उपक्रम राबविला जाणार आहे. यासाठी एकूण खर्च: ₹४.९५ कोटी अपेक्षित असून यामध्ये १५०० लाभार्थी कुटुंबे समाविष्ट आहेत. निवडलेल्या गावांमध्ये हवामान सुसंगत आणि शाश्वत शेतीला चालना देऊन, उपजिविकेच्या संधी वाढवून आणि जीवनमान उंचावून समुदायाचे कल्याण आणि समृद्धी साधणे ही प्रमुख उद्दिष्टे



असून प्रमुख उपक्रमांद्वारे ही उद्दिष्टे साध्य केली जातील.याअंतर्गत हवामान सुसंगत व शाश्वत शेतीचा प्रसार, बोडी आधारित शेती प्रणालीचा प्रसार, मृदा व जलसंधारण, जलस्रोत विकास, बोडीमध्ये अंतर्गत मत्स्यपालन, महिला उद्योजकता विकास व संस्था निर्मिती, समुदाय आरोग्य, स्वच्छता व पोषण या बाबींचा समावेश आहे.

मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी प्राधान्याने या भागात समुदाय कल्याणास विशेष लक्ष दिले असून २०२५-२६ या वर्षासाठी ३० जून २०२५ पर्यंत ५०० कुटुंबांची नोंदणी करण्यात आली आहे. १५ बोडी (नैसर्गिक शेतीतलाव) गाळमुक्त करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे शेतीसाठी उपयुक्त पाणीसाठा वाढवण्यास मदत झाली आहे. बोडी आधारित शेती पद्धतीत माशांचे संगोपन, बोडीवर कुक्कुटपालन आणि बोडीतील पाणी शेतीसाठी वापरले जाते. ही पद्धती पाण्याचा कार्यक्षम वापर करते आणि विविध उपजिविका स्रोत प्रदान करते.

२०२७-२८ पर्यंत या प्रकल्पात सहभागी कुटुंबांना व्यापक लाभ होईल. त्यांच्या मूळ उत्पन्नाच्या तुलनेत उत्पन्न दुप्पट होईल, यामुळे शेती उत्पादकता वाढेल, उपजिविका संधी उपलब्ध होतील, शेतकरी गटांच्या माध्यमातून सामूहिक खरेदी-विक्री व्यवस्था निर्माण होईल, तसेच पोषण आणि आरोग्य विषयक जनजागृतीमुळे जीवनमानात लक्षणीय सुधारणा होण्यासही सुरुवात होईल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पाठपुराव्याला कॉर्पोरेट फाउंडेशनच्या सहकार्याने इखऋ संस्थेमार्फत कृतीशील प्रतिसाद मिळत असल्याचे प्रेरणादायी चित्र गडचिरोली जिल्ह्यात बघायला मिळते आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांसाठी खाटा राखीव ठेवणे बंधनकारक

## प्रभावी अंमलबजावणीसाठी रुग्णालयांची तपासणी करावी : ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : धर्मादाय रुग्णालयांमध्ये त्यांच्या एकूण कार्यान्वीत खाटांपैकी १० टक्के निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खटा दुर्बल घटकांतील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे बंधनकारक आहे. याची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी धर्मादाय रुग्णालयांमध्ये जावून तपासणी करावी, असे निर्देश ग्रामविकस व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

धर्मादय रुग्णालय जिल्हास्तरीय समिती त्रैमासिक बैठक मंत्री श्री. गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात संपन्न झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. विनाय काळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी मिल्लाकर्जुन माने, सहायक धर्मादाय आयुक्त सरोजनी मांजेकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलीपे, डॉ. संदीप श्रोती, गेणश मेळावणे, डॉ. सुनिता पवार आदी उपस्थित होते.


निर्धन व दुर्बल संवर्गातील रुग्णांवर आवश्यक व दर्जेदार उपचार होण्यासाठी ही याजना अत्यंत महत्वपूर्ण आहे, असे सांगून मंत्री श्री. गोरे म्हणाले, धर्मादाय अंतर्गत नोंदी असलेल्या रुग्णालयांना शासन अनेक सवलती देते. त्यामुळे रुग्णांसाठी सदर निषांतर्गत आरक्षित खाटा त्यांना पारदर्शकपणे उपलब्ध करुन देण्याच्या योजनेची प्रभावी अंमबजावणी आवश्यक आहे. तसेच शासनास अपेक्षित असलेल्या निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना लाभ होईल. त्यामुळे जिल्ह्यातील एकही रुग्ण सवलतींच्या खाटांपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

सातारा जिल्ह्यात धर्मादाय अंतर्गत १६ रुग्णालये कार्यरत आहेत. नाव्हेंबर २०२४ पासून आत्तापर्यंत १ हजार ७२१ रुग्णांना लाभ देण्यात आला आहे. जिल्ह्यात १५१ खाटा निर्धन तर १५१ खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी उपलब्ध आहेत.



धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा नियमानुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना उपलब्ध करून देणे, धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित असलेल्या रुग्णखाटांची, आरक्षित रुग्णखाटांपैकी उपलब्ध व रिक्त खाटांची तसेच कोणत्या रुग्णालयात कोणत्या आजारावरील उपचाराची सुविधा उपलब्ध आहे याची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवावी. यामुळे गरजु रुग्णांना याचा लाभ घेता येईल व योजनेचा उद्देश पूर्ण होईल, असेही मंत्री श्री. गोरे यांनी बैठकीत सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले, धर्मादाय रुग्णालय असल्याबाबतचा फलक प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात लावला पाहिजे याची दक्षता घ्या. या रुग्णालयांमध्ये अनेकदा खाट शिल्लक नसल्याचे सांगितले जाते, ही गंभीर बाब असून हे टाळण्यासाठी धर्मादाय रुग्णलयाचे या विषयाबाबतचे कामकाज ऑनलाईनच झाले पाहिजे. शासनाच्या डॅशबोर्डवर किती रुग्णांवर उपचार केले, किती खाटा शिल्लक आहेत याची रोजच्या रोज माहिती भरली गेली पाहिजे. धर्मदाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकासाठी असणाऱ्या खाटा, उपचार सवलत यांची माहिती व्हावी यासाठी शासनाने डिजीटल प्लॅटफॉर्म उपलब्ध दिला आहे. लहरीळीूंशवळलरश्र-हशश्रविशीज्ञ ारहरीहीींर.सीं.ळप या संकेतस्थळावर त्याची माहिती उपलब्ध होते. हा सर्व कारभार पारदर्शीपणे चालवण्यासाठी या अंतर्गत होणारे काम हे ऑनलाईन असले पाहिजे. सहायक धर्मदाय आयुक्त कार्यालयाबरोबर जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनीही धर्मादाय रुग्णालयांची वेळोवेळी तपासणी करावी, अशाही सूचना जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केल्या.



## बा विठ्ठला मंदिर समितीच्या भ्रष्ट कारभाऱ्यांना सद्बुद्धी दे ! गणेश अंकुशराव यांचे पांडुरंगाला साकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपुरातील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमधील भोंगळ कारभारामुळे संबंध महाराष्ट्रातून मंदिर समिती प्रशासनावर टीका होत असतानाच आता पंढरपुरातील महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी सुध्दा मंदिर समितीच्या गैरकारभाराविरूध्द यल्गार पुकारला आहे.

दर्शन रांगेतील भाविकांना मारहाण, सुरक्षा कर्मचाऱ्यांची मुजोरी, व्हीआयपी दर्शनाचा वाद, गोशाळेतील गोमाता व गोवंशाची सुरक्षा धोक्यात, स्वच्छतेच्या टेंडर मधील घोटाळा, मंदिर संवर्धनाच्या कामात घोटाळा आणि निकृष्ट दर्जाचे कामामुळे ऐन पावसाळ्यात मंदिरात होणारी गळती अशा विविध मुद्द्यांवरून गेल्या अनेक दिवसांपासून गणेश अंकुशराव यांनी रान उठवलेलं दिसून येत आहे. या विरूद्ध त्यांनी अनेकदा मंदिर समिती प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही धारेवर धरलं होतं.

आज अंकुशराव यांनी थेट श्रीविठ्ठलाच्या चरणावर निवेदन ठेवून बा विठ्ठला आता तूच शासनाला सद्बुद्धी दे आणि मंदिर समिती प्रशासनाच्या भोंगळ कारभार उजेडात आणून दोषींना कडक शासन करण्यासाठी तुझी काठी उचल ! अशी प्रार्थना गणेश अंकुशराव यांनी केलीय.

## नांदकर येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील नांदकर येथील एका शाळेत दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचां गुणगौरव सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

दरवर्षी प्रमाणे यावर्षीही नांदकर सांगे गृप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच व समाजसेवक मनोज प्रकाश पाटील यांच्या संकल्पनेतून माध्यमिक विद्यालय नांदकर या शाळेत दहावी गुंणवत व सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचां गुणगौरव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पारितोषिक, प्रशस्तीपत्र, देऊन सन्मानीत करण्यात आले तर इतर विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांचां उस्फूर्त प्रतिसाद मिळाला तर या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते प्रकाश पाटील भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार शांताराम मोरे शिवसेना तालुकाप्रमुख इंद्रपाल तरे माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्णा वाकडे महीला आघाडी प्रमुख फशीताई पाटील ठाणे जिल्हा ओबीसी संघर्ष समिती सरचिटणीस प्रमोद जाधव शिवसेना तालुका सचिव भावना ढमणे, सुभाष भामरे, दशरथ पाटील उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सरपंच विलास जाधव, निलेश कोळी, सुरज खंडागळे, रोशन पाटील, विकास भोईर, विजय घरत, संकेत घरत, विजय थेटे, वैभव थेटे, अनिकेत दळवी अविनाश घरत, जयवंत घरत, बबलु जाधव, अभय चव्हाण, यांनी मेहनत घेतली.




## स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांची 'फ्लेक्झ्रर' कंपनीत निवड; प्रत्येकी वार्षिक रु ४.५ लाखांचे पॅकेज!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**







पंढरपूरः 'फ्लेक्झ्रर' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या २ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

'फ्लेक्झ्रर' या नामांकित व बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून इंजिनिअरिंगच्या शावरसिद्ध नागनाथ गुरव व विना संजय बरसावडे या दोन विद्यार्थ्यांची कंपनीसाठी निवड केली. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. ४.५ लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. १९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून प्लेसमेंटच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत.

स्वेरीचे विद्यार्थी आज विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यात आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. विद्यार्थ्यांना ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत स्वतंत्रपणे कुशल प्रशिक्षकांद्वारे एप्टीट्युड, कम्युनिकेशन स्कील, टेक्निकल स्कील, विविध सॉफ्टवेअर्स, मॉक इंटरव्युव्ह यांचे प्रशिक्षण दिले जाते. स्वेरीमध्ये वार्षिक परीक्षांचे उत्कृष्ट निकाल, संशोधने, मानांकने, इन्फ्रास्ट्रक्चर याबरोबरच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून करिअरच्या दृष्टीने सर्वात महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या प्लेसमेंटकडे देखील अधिक लक्ष दिले जाते व मोठमोठ्या कंपन्यांना हवे तसे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी घडविण्यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञांकडून उत्कृष्ट मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट बरोबरच संबंधित विभागातील प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'फ्लेक्झ्रर' या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रभाऊफडणवीस साहेब आणि उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने मंगळवेढा शहरातील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने आमदार श्री समाधान दादा आवताडे साहेब यांच्या मार्गदर्शनात रक्तदान शिबीर पार पडले.



मंगळवेढा शहरातील हजरत पीर गैब-वो-मर्दाने गैब येथे आयोजित केलेल्या या उपक्रमासाठी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमास मतदारसंघाचे आमदार श्री आवताडे यांनी उपस्थित राहून या विधायक आणि लोकोपयोगी उपक्रमामध्ये सामील झालेल्या रक्तदात्यांचे विशेषतः महिला भगिनींचे विशेष कौतुक केले.

तसेच सामाजिक एकात्मता आणि सलोख्याची बंधुता अंगीकारणाऱ्या सदर समाज बांधवांनी अशा प्रकारे समाजसेवेचे कार्य पुढेही करत राहावे, अशा शुभेच्छा यानिमित्ताने दिल्या.

### नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा

### उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील

# प्राचार्यांचे निवृत्ती वय ६५ करण्यासाठी सकारात्मक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीत प्राध्यापक आणि प्राचार्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी धोरणाचे सर्व पैलू समजून घ्यावेत. प्राचार्यांच्या मागणीनुसार, त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरून ६५ वर्षे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय लवकरच घेतला जाईल, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज येथे केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या ४० व्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार किरण सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, जगात सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. पारंपरिक शिक्षणाऐवजी व्यावसायिक आणि प्रात्यक्षिक-आधारित शिक्षणाची आज गरज आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही गरज पूर्ण करेल. विद्यार्थी हित जोपासून शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राला अग्रस्थान मिळवून देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आधुनिक अभ्यासक्रम तयार करणे आणि मातृभाषेतून शिक्षण देणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना कारखान्यात प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि सायंकाळी सैद्धांतिक अभ्यास अशी शिक्षण पद्धती राबवली जावी. यामुळे रोजगारनिर्मिती आणि संशोधनाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.




**२०४७ पर्यंत सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट**

मंत्री पाटील यांनी सांगितले की, २०४७ पर्यंत भारताला सर्व क्षेत्रात अग्रेसर करण्यासाठी युवा पिढीला संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे हे उद्दिष्ट साध्य होईल. बेरोजगारी संपवून प्रत्येकाच्या हाताला काम देणे, यातूनच आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

**मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन**

राज्य शासन मुलींना पहिली ते पदवीपर्यंत मोफत शिक्षण देत आहे. ८४२ अभ्यासक्रमांचे शुल्क माफ करण्यात आले आहे. यात ट्यूशन आणि परीक्षा शुल्काचा समावेश आहे. येत्या काळात इतर शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला जाईल. यामुळे मागील वर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या ५३ हजारांनी वाढली आहे. विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहाय्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्री यांनी ५,५०० नवीन प्राध्यापक आणि २,९०० शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीला मान्यता दिली आहे. तसेच, १९९३ पासून प्रलंबित असलेला एम.फिल, नेट/सेट बंधनकारक प्रश्न निकाली काढण्यात आला असून, यासाठी सुमारे १ हजार कोटी रुपये वितरित केले जातील. असोसिएट प्रोफेसर ते प्रोफेसर पदोन्नतीचा प्रश्नही लवकरच सोडवला जाईल, असे पाटील यांनी सांगितले.

यावेळी अधिवेशनानिमित्त तयार केलेल्या स्मरणिकेचे विमोचन आणि उद्योग विभागाशी संबंधित 'आय हेल्प'वेब पोर्टलचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले.

या समारंभात लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉली विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, एनसीएल सुकाणू समितीचे सदस्य सीए अनिल राव, अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, उपाध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम, सचिव डॉ. सुधाकर जाधवर, प्राचार्य स्मिता देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

# रुग्णालयांनी गरजू रुग्णांना शासकीय योजनांचा तत्परतेने लाभ द्यावा

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर; विविध आरोग्य योजनांबाबत घेतली आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा गरजू रुग्णांना तत्परतेने लाभ देण्याकरिता पुढाकार घ्यावा, या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत न झालेल्या रुग्णालयानी नोंदणी करुन घ्यावी, याकामी राज्य शासनाच्यावतीने सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

यशदा येथे आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार कैलास पाटील, आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आरोग्य उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई यांच्यासह रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री. आबिटकर म्हणाले, आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने अतिशय महत्वाच्या



योजना आहे. धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत जिल्हात विविध रुग्णालये नोंदणीकृत असून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना आजारपणाच्या काळात सकारात्मक पद्धतीने मदत करण्याची भावना ठेवावी. त्यांची सेवा करण्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे.

धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १० टक्के याप्रमाणे एकूण २० टक्के खाटा आरक्षित करणे बंधनकारक असून त्याअनुषंगाने धर्मादाय संस्थाच्या कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांनी तत्परतेने काम करावे, शासनाच्या निर्देशाप्रमाणे रुग्णांना खाटा उपलब्ध करुन द्याव्यात.

पुणे जिल्ह्यात रुग्णांची संख्या तसेच वैद्यकीय उपचाराकरिता येणाऱ्या खर्चाचा विचार करता धर्मादाय रुग्णालयाची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे गरजू रुग्णांना गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, सेवा दिल्यानंतर रुग्णाच्या मनात रुग्णालयाप्रती समाधानाची भावना निर्माण झाली पाहिजे, यादृष्टीने काम करावे, असेही श्री. आबिटकर म्हणाले.

डॉ. शेटे म्हणाले, शासनाच्या आरोग्य विषयक योजनांचा प्रत्येक गरजू रुग्णांना लाभ देण्याकरिता राज्य शासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे रुग्णालयांनी पात्र रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा देवून सहकार्य करावे, याकामात हलगर्जीपणा होणार नाही, याबाबत रुग्णालय व्यस्थापनाने दक्षता घ्यावी, असेही डॉ. शेटे म्हणाले.

राज्य कामगार विमा रुग्णालयाची पाहणी

पिंपरी-चिंचवड मोहननगर येथील राज्य कामगार विमा योजनेच्या रुग्णालयाला आरोग्य मंत्री यांनी भेट देऊन बाहय रुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, औषधी भंडार,आहार कक्षाला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. येथील रुग्णांशीही संवाद साधून अडीअडचणी जाणून घेतल्या.

रुग्णांना चांगल्या सेवा सुविधा देण्याकरिता डॉक्टर व प्रशासनानी काळजीपूर्वक लक्ष द्यावे व दर्जेदार सेवा द्याव्यात, अशा सूचना श्री. आबीटकर यांनी केल्या.

# तुळजापूर येथे रिपाइं (आठवले) पक्षाच्या विशेष बैठकीत नूतन पदाधिकारी यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : रिपाइं (आठवले) चे महाराष्ट्र प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ यांच्या प्रमुख मार्गदर्शना खाली तुळजापूर (जिल्हा धाराशिव) येथे शासकी विश्रागृहात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाची तालूकास्तरीय विशेष बैठक संपन्न झाली असून या बैठकित पक्षाच्या नूतन तालूका कार्यकारणी पदाधिकारी व जिल्हा कार्यकारणीत निवड झालेल्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी केंद्रीय सामाजिक न्याय व आधिकारिता राज्य मंत्री नामदार रामदास आठवले यांची नुकतच फेरनिवड झाल्या बद्दल त्यांच्या आभिनंदनाचा महत्वपूर्ण ठराव ही घेण्यात आला.

**नामदार रामदास आठवले यांची पूनश्च : रिपाइंच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल बैठकीत घेतला अभिनंदनाचा ठराव**

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अध्याक्ष विद्यानंद बनसोडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपाइं (आठवले ) चे मराठवाड विभाग प्रदेश कार्याध्यक्ष आनंद पांडागळे, जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के,जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे आदी होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना राजाभाऊ ओव्हाळ म्हणाले की रिपब्लिकन पक्षात बंधुभाव,समानता व न्यायीक लोकशाही असून सर्व बहुजनांचे नेत्रत्व करणारा हा पक्ष आहे. नुतन पदाधिकार्यांचा सन्मान सोहळ्याने कार्यकर्त्यांचे मनोबल वाढते त्याना जबाबदारीची जाणीव होते.सन्मान सोहळ्यात मिळणाऱ्या हार फुलांची किंमत करता येत नाही त्या पाठीमागे असलेली भावना महत्वाची असून समाजाच ओझं आपल्या खांद्यावर आलेले आहे याची जाणिव ठेवून कार्यकर्त्यानी समाजाच्या न्याय हक्कासाठी, गोरगरीब बांधवांच्या आर्थिक विकास करण्याचा आणि समाजाच संघटन करण्याचा प्रयत्न करावे. अपण लोकचळवळत सक्रिय झाल्याशिवाय रिपब्लिकन चळवळ गतीमान होणार नाही. असा सल्लाही त्यानी शेवटी कार्यकर्त्याना दिला.

प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात कार्यकर्ते जमा होऊन हालग्यांच्या कडकडाटात, फटाक्यांच्या आतिशबाजीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ.रामदासजी आठवले यांची रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी पुनश्च बिनविरोध निवड झाल्याबद्दल पेढे वाटून . उत्सव साजरा करून तुळजापूर येथिल शासकीय गेस्ट हाऊस येथे बैठक घेण्यात आली.

या बैठकीत रिपब्लिकन पक्षाचे हितचिंतन युवा कार्तकर्ते महादेव जेरीथोर यांच्या वतीने नुतन धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के, जिल्हा चिटणीस डिंगबर कांबळे, तुळजापूर तालुकाध्यक्ष अरूण लोखंडे,जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे,जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, तालुका उपाध्यक्ष किसन पांडागळे,तालुका सचिव,सुरेंद्र सुर्यवंशी,तालुका संघटक सुरेश लोंढ,नळदुर्ग शहराध्यक्ष मारूती खारवे, तुळजापूर शहराध्यक्ष वैजिनाथ पांडागळे, नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे,युवक तालुकाध्यक्ष शुभम कमलचंद कदम, युवक तालूका सरचिटणी प्रदिप सिरसाट आदिंच्या सार्थ निवडी निमित्त सत्कार करण्यात आला. या प्रसंगी नामदार रामदास आठवले यांची रिपाइंच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी पूनश्च फेरनिवड झाल्या बद्दल त्यांच्या आभिनंदनाचा ठराव युवा तालूका अध्यक्ष शुभम कदम यानी मांडला त्यास रिपाइंचे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यानी अनूमोदन दिले. सर्वानूते प्रचंड टाळयाच्या गजरात हा ठराव सहमत करण्यात आला.

यावेळी युवा कार्यकर्ते महादेव जेटीथोर,नाशिक कांबळे, उपसरपंच भिमराव सोनवणे, सुधाकर मस्के, सुभाष मस्के, विकास ठाकूर, महादेव सोनवणे, चंचल कदम, अनिल तुळसे, सचिन प्रताप, दिलीपराव भांगे, पप्पू सर्जे, रईस पटेल, डिगंबर कांबळे,काकासाहेब भंडारे, वैभव जानराव, दिलीप मस्के, नागेश दिवटे आदिंसह रिपाइंचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निरागस हास्य फुलवण्यासाठी नमस्ते नासिक फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/प्रतिनिधी : जिथे कमी तिथे आम्ही या तत्त्वाला अनुसरून समाजातील दुर्लक्षित घटकांसाठी कार्यरत असलेल्या नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्यातर्फे दिनांक २२ जुलै २०२५ रोजी नाशिक येथील निरीक्षण गृह व बालगृह उंटवाडी रस्ता त्रिंबक रोड येथे हास्य योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते.फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल देव यांनी महिला व मुलींना विविध व्यायामाचे प्रात्यक्षिके दाखवून त्यांच्याकडून व्यायाम करून घेतला, ह्या उपक्रमामागील उद्देश म्हणजे बाहेरच्या जगाशी फारसा संबंध नसलेल्या निरीक्षणगृहातील मुले व मुली यांच्या निरागस चेहऱ्यावरती आनंदाची झुळूक उमटवणे व त्यांच्या मनात सकारात्मक ऊर्जा



संचारित करणे, त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा हा एक संवेदनशील आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम ठरला आहे.

सामाजिक बांधिलकी जपत निरीक्षण गृहातील मुले व मुली यांना हास्य योगा सत्राबरोबरच सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटपही करण्यात आले.

याप्रसंगी नमस्ते नाशिक फाउंडेशनचे अध्यक्ष स्नेहल देव यांनी आजवर घेतलेला हा सर्वात उत्कृष्ट आणि सेवाभावी उपक्रम ठरला आहे. त्या पुढे म्हणाल्या बालकांच्या जीवनात केवळ भौतिक गरजाच नव्हे तर प्रेम, हास्य आणि माणुसकीची उब देखील महत्त्वाची आहे. आमच्या या छोट्याशा प्रयत्नांनी त्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवू शकेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास बीके पाखले, चंदुलाल शहा,अनिल नहार, अश्विनी कुलकर्णी, अनिता शेट्टी, सुरेखा बोरसे, रंजना चिंचोरे, मेघना बरोटे, सुवर्ण सायकर, दीपा भावसार, पुष्पलता चोपडे, जयंत जामदार, आदी मान्यवर उपस्थित होते. हास्य हे आरोग्याचे टॉनिक आहे हे अधोरेखित करण्याचा हा कार्यक्रम निश्चितच एक अनुकरणीय सामाजिक पाऊल ठरणार आहे असे कार्यक्रमाचे अध्यक्ष मातोश्री ट्रॅव्हल्स चे अध्यक्ष आनंद चोरडिया यांनी म्हटले.

# हिंगोली जिल्ह्यासाठी उद्या ऑरेंज अलर्ट जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हिंगोली/प्रतिनिधी : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या हवामान अंदाजानुसार हिंगोली जिल्ह्यात दि. २५ जुलै २०२५ रोजी येलो अलर्ट तर दि. २६ जुलै २०२५ रोजी ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आलेला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता असून, विजेच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार ते अतिमुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या नैसर्गिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी खालील मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत:

**काय करावे:**



**प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबईकडून सतर्कतेचा इशारा; नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन**

विजेच्या गडगडाटासह पावसाची शक्यता असल्यास बाहेर जाणे टाळा. मोकळ्या जागेत असल्यास सखल भागात जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. बाल्कनी, छत किंवा ओट्यावर थांबू नका. घरातील विजेची उपकरणे बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर धातूच्या वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असल्यास तत्काळ सुरक्षित जागी हलवा.

**काय करू नये:** विजा चमकत असताना लँडलाईन फोन, विद्युत उपकरणांचा वापर, शॉवरखाली अंघोळ किंवा बेसिनच्या नळाला स्पर्श करू नये. धातूच्या तंबू किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाखाली थांबू नका. धातूच्या उंच मनोऱ्याजवळ थांबू नका. उघड्या दरवाजातून किंवा खिडकीतून वीज पाहण्याचा प्रयत्न करू नका.

हवामान खात्याच्या सूचनांनुसार जिल्हा प्रशासन सतर्क असून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तयार ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी सामाजिक माध्यमांवरील अपप्रचार टाळून अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**निवडणूक पूर्वतयारी संबंधी अमरावती विभागाचा घेतला आढावा**

**राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे**

# निवडणूक मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी उत्तम नियोजन करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती : आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूका मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी सर्व अनुषंगीक बाबी, सोयी-सुविधा संदर्भात अचूक नियोजन करुन ठेवावे, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे दिले.

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारीचा आढावा श्री. वाघमारे यांनी विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत घेतला. त्यावेळी ते बोलत होते. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, राज्य निवडणूक आयोगाचे विशेष कार्य अधिकारी अ. गो. जाधव, जिल्हाधिकारी आशिष येरेकर (अमरावती), अजित कुंभार (अकोला), डॉ. किरण पाटील (बुलडाणा), श्रीमती बुवनेश्वरी एस. (वाशिम), यवतमाळचे प्रभारी जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, उपायुक्त संतोष कवडे यांच्यासह पाचही जिल्ह्यांचे जिल्हा परिषद व नगरपालिका प्रशासनचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त श्री. वाघमारे यांनी आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने अमरावती विभागाचा निवडणूक पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने वाढ झालेल्या मतदारांची संख्या, मतदान केंद्राची संख्या अनुरुप मनुष्यबळाचे नियोजन करावे. मतदान केंद्रावर महिला निवडणूक अधिकारी-कर्मचारी व मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची, स्वच्छतागृहाची सुविधा करण्यात यावी. दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प,



व्हिलचेअर आदी सुविधांची उपलब्धता प्रत्येक मतदान केंद्रावर करुन ठेवावी. मतदान केंद्रावर मतदारांसाठी प्रशासनाने सुविधा न केल्याने मतदानाचा टक्का कमी झाला, अशी तक्रार येता कामा नये. संवेदनशील मतदान केंद्रावर कडक पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात यावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

ईव्हीएम मशीन उपलब्धता यादृष्टीने जिल्ह्यांनी सर्वप्रथम त्यांच्याकडील मशीनची प्रथम स्तर तपासणी (एफएलसी) करुन घ्यावी व त्यानुषंगाने कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व अनुषंगीक बाबींची दुप्पट प्रमाणात उपलब्धता करण्यात यावी. ज्या जिल्ह्यात अधिक ईव्हीएम मशीन असेल त्यांनी लगतच्या जिल्ह्यांची मागणी पूर्ण करावी. निवडणुकीचे कामकाज करण्यासाठी लागणारे अधिकारी-कर्मचाऱ्यांची कमतरता पूर्ण करण्यासाठी आयोगाला त्यासंदर्भात एकत्रित मनुष्यबळाची मागणी कळविण्यात यावी. निवडणुकीसाठी लागणारे मनुष्यबळ घेताना, त्यासंबंधीचे नियुक्ती आदेश निर्गमित करताना आयोगाच्या दिशा-निर्देशांचे काटेकोर पालन करण्यात यावे. अनुभवी मास्टर ट्रेनर यांची नेमणूक करुन प्रशिक्षणाचे आयोजन करुन निवडणूक प्रक्रिये संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात यावे. दि. १ जुलै २०२५ या अर्हता दिनांकावर मतदार यादी निश्चित करण्यात येणार आहे. त्यानुसार मतदार यादी व विभाजन याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त श्री. वाघमारे यांनी यावेळी दिल्या.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अंतर्गत जिल्हा परिषद, महापालिका व नगरपालिकांच्या निवडणुका राज्यात होणार आहेत. यानुषंगाने जिल्हा प्रशासनाने आवश्यक सर्व बाबींची पूर्तता होण्यासाठी अचूक नियोजन करावे. ग्रामीण व शहरी भागातील सर्व मतदारांना निर्भय वातावरणात मतदान करता यावे, यासाठी मतदान केंद्रावर मतदार यादी तसेच सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. मतमोजणीसाठी तालुकास्तरावर पुरेशी जागा असलेले गोडावून उपलब्ध होतील, यादृष्टीने नियोजन करावे. निवडणूका पारदर्शक व मुक्त वातावरणात पार पडण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणांनी जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, असे आयोगाचे सचिव श्री. काकाणी यांनी यावेळी सांगितले. विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी आयोगाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करुन विभागात निवडणूका सुरळीत पार पाडल्या जातील, असे यावेळी सांगितले आणि पूर्व तयारीचा आढावा दिला. यावेळी विभागातील जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील निवडणूक पूर्वतयारी संदर्भात सादरीकरणाच्या माध्यमातून माहिती दिली.